औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक ६.७.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०५) इतिवृत्त

बुधवार दिनांक ६ जुलै २००५ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशिनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.१० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०३) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०४) श्री. जगीरदार अजीजमुख्तार अहमद
(०५) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०६) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०७) श्री. दाभाडे मिलिंद यशवंत
(०८) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०९) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(१०) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(११) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१२) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१३) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

संवाद :

सौ.लता दलाल :महानगरपालिकेचे स्थायी समितीचे माजी सभापती व माजी राज्यमंत्री श्री गंगाधर गाडे यांचे वडील सुखदेव गाडे यांचे दु:खद निधन झाले त्यांना व महानगरपालिकेचे दोन सुरक्षा रक्षक स्व.मानसींग चरण तसेच स्व.सुभाष शिंपी यांचेही दु:खद निधन झालेले आहे तसेच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रझवी यांच्या मातोश्रींचेही दु:खद निधन झालेले आहे या सर्वांना सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.अजीजजहागीरदार : यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

(याच वेळी स्व. सुखदेव गाडे तसेच सुरक्षा रक्षक स्व.मानसींग चरण व स्व.सुभाष शिंपी आणि डॉ.रझवी यांच्या मातोश्री पै.सय्यदा मकबूल फातेमा यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

मा.सभापती : आजच्या सभेची विषय पत्रिका सर्व सदस्यांना देणयात आलेलीच आहे.बैठकीचा विषय हा सन २००५-२००६ या वर्षाचा अर्थसंकल्प मा.आयुक्त व मुख्यलेखाधिकारी हे स्थायी समितीकडे सादर करणार आहेत. नेहमीच्या पध्दतीपेक्षा यावेळी वेगळी पध्दत अवलंब केलेली आहे. सर्वांसमक्ष सभागृहात हा अर्थसंकल्प सादर करावा म्हणून प्रशासनास तश्या सूचना करण्यात आलेल्या होत्या. त्यासाठी या बैठकीचे आयोजन केलेले आहे. आज

फक्त प्रशासन अर्थसंकल्प सादर करणार आहे. या अर्थसंकल्पाच्या संदर्भाने चित्रफित दाखविण्यात येणार आहे त्यानुसार प्रशासन माहिती देतील यानंतर सर्व सदस्यांना अर्थसंकल्पाच्या पुस्तीका अभ्यास करण्यासाठी देण्यात येतील. त्यावर सर्व सदस्यांनी अभ्यास करावा जनतेच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने चांगला अर्थसंकल्प असावा असे वाटते. आजच्या सभेत कोणतीही चर्चा करू नये. प्रशासनाची बाजू ऐकण्यासाठी बैठक आयोजीत केलेली आहे. येणाऱ्या सभेत चर्चा होईल.

मुख्यलेखाधिकारी : महानगरपालिकेचा २३ वा अर्थसंकल्प मा.आयूक्त हे मा.सभापती यांचेकडे सादर करणार आहे .प्रशासनातर्फे सर्व स्थायी समितील सदस्याचे तसेच मा.सभापती यांचे पुष्पगुच्छ देउन स्वागत करण्यात येते प्रथमत:मा.आयूक्त हे मा.सभापती यांचे पुष्पगूच्छ देउन स्वागत करतील.तसेच सर्व स.सभासदांचे स्वागत लेखाधिकारी श्री.पवार हे करतील.

(याच वेळी मा.सभापती तसेच सर्व स्थायी समिती सदस्यांचे पूष्पगूच्छ देउन स्वागत करण्यात येते.)

हा अर्थसंकल्प तयार करतांना मा.आयुक्त यांनी सर्व अधिकारी व लेखा विभागाचे कर्मचारीयांना बहुमोल मार्गदर्शन केले.या अर्थसंकल्पात वैशिष्टयपूर्ण बाबी त्यांनी त्यांचे अनुभवाच्या माध्यमातून नमूद केलेल्या आहे.या प्रसंगी मा.आयूक्ताचे बहूमोल मार्गदर्शन लाभले त्यामूळे लेखा विभागातर्फे मी स्वत: मा.आयु क्ताचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतो.

(याचवेळी मा.आयुक्त यांचे मुख्यलेखाधिकारी हे पुष्पगुच्छ देउन स्वागत करतात)

मा.आयुक्त यांना विनंती की त्यांनी या वर्षाचा अर्थसंकल्प मा.सभापती यांचेकडे सादर करावा.

(याच वेळी मा.आयुक्त अर्थसंकल्प मा.सभापती यांचेकडे सादर करतात.)

आता मा.आयुक्त हे त्यांचे मनोगत व्यक्त करतील अर्थसंकल्पाच्या संदर्भाने चित्रफित दाखविण्यात येणार आहे त्यानुसार मा.आयुक्त माहिती देतील स.सदस्यांना पूर्णपणे माहिती या माध्यमातून मिळेल.

मा.आयुक्त : मला या महानगरपालिकेत वार्षिक नियोजनाची संधी मिळाली. जुलै पासून नियोजन करीत आहोत. बजेट १००% चांगले आहे. या संबधीची माहिती संपूर्णत: मिळावी म्हणून अर्थसंकल्पाच्या संदर्भात चित्रफित तयार केलेली आहे. संगणकाद्वारे सादरीकरण करीत आहोत. यामुळे उद्देश स्पष्ट होईल. मा.सभापती यांनी बैठक आयोजीत केली व बजेट सादर करण्याची संधी मला मिळाली.सन २००५-०६ चा हा अर्थसंकल्प आहे. तीन महिण्याचा अर्थसंकल्प या अगोदरच मंजूर केलेला आहे परंतू या अर्थसंकल्पात ज्या रक्कमा दिल्या आहेत त्या पूर्ण वर्षाच्या आहेत.जूलैपर्यत तीन महिण्याच्या बजेट मंजूरी नूसार खर्च चालू आहे. पुढील वर्षाचे बजेट बघण्यापूर्वी मागिल वर्षात किती वसूली झाली हे पाहणे गरजेचे आहे सर्वांना माहिती होईल. मागिल वर्षाचे १७३ कोटीचे बजेट होते त्यापैकी १३४ कोटीच प्रत्यक्षात वसूल झालेले आहे.त्यात जकात ७१ कोटी, पाणीपट्टी १४ कोटी, संकीर्ण उत्पन्न ११

कोटी,मालमत्ता कर ९.६४ कोटी,शासनाचे अनुदान ६.०२ कोटी ,नगररचना विभागाचे ५.२६ कोटी ,इतर वसूली धरता १३४ कोटी वसूली झालेली होती.

मागिल वर्षी असा रूपया गेला त्यात पगार भत्ते यावर ४७ कोटी, पाणी पूरवठा विभागावर ३० कोटी खर्च झालेले आहे प्रत्यक्षात वसूली ही ११ कोटीचआहे .सार्वजनिक आरोग्य व सफाई यावर २७ कोटीचा खर्च झालेला आहे. इतर भाडवली खर्च हा १६ कोटी झालेला आहे.सार्वजनिक सूरक्षा मधे ६.१२ कोटी,ड्रेनेजवर ३.४६ कोटी हा खर्च झालेला आहे. शासकीय देणे २.१४ लक्ष असा एकूण १३४ कोटीचा खर्च झालेला आहे.

आता या वर्षीचे उत्पन्न जकातीचे ८० कोटीचे गृहीत धरलेले आहे. पाणीपट्टीचे एकूण डिमांड ५३ कोटी असून किमान ४० कोटी वसूल होतील.यासाठी अधिकारी कर्मचारी यांना जस्त मेहनत घ्यावी लागेल व अधिकारी कर्मचारी जस्तीत जस्त वसूली करून देतील अशी मला खात्री आहे.तसेच ३२.५० कोटीचे कर्ज उभारणी करायची आहे. एम.जी.पी.ची महानगरपालिकेकडे १२० ते १३० कोटीची थकबाकी आहे निर्भय योजनेत सहभाग घेतला तर ३२ कोटी खर्च केले तर जी थकबाकीआहे ती दूर होऊ शकते.या बाबतचे प्रकरण बँकेकडे आहे. या महिण्याच्या अखेरपर्यत किंवा पूढील महिण्यापर्यंत होईल असे वाटते.मालमत्ता कर २५.४० कोटी आहे थकबाकी समावेश करता एकून ४९ कोटीची डिमांड आहे. ३२ कोटी वसूल करण्याचे प्रयत्न राहतील.अनुदानाची रक्कम १५.२० कोटी, संकीर्ण किरकोळ १२.२२ कोटी शासकीय इतर दायित्व जे शासनासाठी वसूल करतो ते आपल्याकडे जमा होते आणी तितकाच खर्च होते ते मालमत्ताच्या टक्केवारी नूसार घेतो. ते ९.६६ कोटी आहे, नगररचना वसूली ६ कोटी ,यात जकात वसूलीवर भर देणार आहोत.

आता खर्च होणारा रूपया याप्रमाणे सार्वजनिक आरोग्य वसुखसोयीयावर ६० कोटी जईल,पगार व भत्ते यावर ५२.५१ कोटी पाणी पुरवठा यावर ४२.७० कोटी खर्च होतील.सध्याच्या चालू मागणीनूसार पाणी पूरवठयात दरवर्षी १५ ते २० कोटी वसूलीपेक्षा जस्त खर्च होतात.तरी या वर्षी पाणीपट्टीत वाढ केलेली नाही थकबाकी वसूल करण्यावर भर आहे. कर्ज परतफेड ३३.६५ कोटी, संकीर्ण किरकोळ खर्च हा १६.४२ कोटी आसपास जईल सार्वजनिक सुरक्षा ७.९२ कोटी जलनि:स्सारण ५.५२ कोटी, शासकीय देणे हे ४.६२ कोटी जे काही वसूल करू त्या प्रमाणे दयावे लागेल.याप्रमाणे पैसे जण्याचे नियोजन राहील.

जे काही खर्च करणार आहे त्यामागची ठळक वैशिष्टये अशी आहे जे काही मालमत्ताकर वसूल करणार आहोत जे नागरीक १०० टक्के थकबाकीसह मालमत्ता कर भरणा करेल त्यांचेसाठी २५ हजर रूपयाचा या वर्षीचा विमा काढणार आहोत या स्किमसाठी ७ते ८ लक्ष खर्च येईल.एक खिडकी योजना कार्यान्वित करीत आहोत.बीओटी पध्दतीने वेगवेगळे प्रकल्प हाती घेण्याचा मानस आहे.या शहराचा विकास होण्यासाठी बीओटी पध्दतीने विकास

करण्यावर भर राहील. यात महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक बोज येणारनसून उलट उत्पन्न वाढू शकेल. तसेच कराच्या बाबतीत प्रामुख्याने जकात कराचे रचनेचे मूल्यमापन करून पुनर्रचना करणे यामुळे जकात कराचे उत्पन्न वाढू शकते तसेच उद्यान व प्राणी संग्रहालय या विभागाचा स्तर उंचावण्यासाठी विशेष अशी तरतूद ४० लक्षची ठेवण्यात आलेली आहे. काही सेवांचा स्तर उचांवण्यासाठी खाजगीकरणाची कार्यवाही करण्याचा मानस आहे. त्यामागे उद्देश असा राहील की महानगरपालिकेचा खर्च कमी व्हावा. नवीन उद्योजकांना जकात करात काही प्रमाणात सूट देणे गरजेचे आहे यामुळे नवीन उद्योग वाढतील व जकातीत भर पडेल तसेच ज्या कंपन्या चालू आहेत त्याचे उत्पन्नाची वाढीव क्षमता वाढतील तर जकातीच्या उत्पन्नात यामूळे वाढ होईल. नवीन उद्योजकांना पहिल्या वर्षी २०टक्के दूसऱ्या वर्षी ४० टक्के तर तिसऱ्या वर्षी ६० असे २० टक्केनी वाढ करून ५ वर्षात पूर्ण १०० टक्के जकात वसूल केली जईल.

जमा बाजूमध्ये जकात विभागास ८० कोटीचे उद्दिष्ट दिलेले आहे मालमत्ता ३५ कोटी, पाणीपट्टी ४० कोटीचे टारगेट दिलेले असून प्रत्येक महिण्याला जस्तीत जस्त कर वसूल करण्याचामानस राहील.तसेच या वर्षीच्या अर्थसंकल्पात अपंग व्यक्तीसाठी एक स्कीम राबवीत आहोत महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्यातरी इमारतीमधे अपंग व्यक्तींना व्यवसाय करण्याकरीता जगा देण्याचा मानस असून भाडे कमीत कमी राहील. त्या व्यक्तीने दुकानात खेळणी किंवा मशीनरीचे स्टॉल लावणे वगैरे करावे. यासाठी अपंग व्यक्तीचे अर्ज मागणी करणार आहोत वाजवीपेक्षा जस्त अर्ज आल्यास लॉट्री पध्दतीने कार्यवाही करणार आहोत रोजगार मिळण्याच्या दृष्टीने ही स्कीम ठेवलेली आहे.एक खिडकी योजना तसेच स्ट्रीट लाईटच्या बाबतीत खाजगी संस्थेमार्फत सुविधा घेणार आहोत तसा प्रस्ताव स्थायी समितीसमोर येईलच .प्रशासकीय खर्च ५२ कोटी होणार आहे पाणीपूरवठयावर ४३ कोटी होणार आहे शहरात सध्या १३० ते १३५ एमएलडी पाणी येते. शहरासाठी फारच कमी आहे. शहराचा व्याप व लोकसख्येत वाढ होणार असून पून्हा २ ते ३ वर्षात पाण्याच्या संदर्भात मोठा प्रश्न समोर राहील विकास कामामधे त्याचा अडसर येऊ शकतो. पाणी पुरवठा नवीन योजनेसाठी पीएमसी नियुक्त करणार आहोत पूढील सभेत तसा प्रस्ताव येईल त्याचा संपूर्ण खर्च हा बजेटमधे ठेवलेला आहे भूमीगत जलनि:स्सारण, नाला सफाईसाठी ३.१८ कोटीची तरतूद आहे पाच टक्के प्रमाणे कमकुवत कल्याणकारी योजनासाठी ३.९६ कोटी तरतूद केली आहे. शहराचे रस्ते हे दोन प्रकारे विकास करण्याचा मानस आहे .रस्ते विकास महामंडळा मार्फत १६५कोटीचे रस्ते तयारहोणार आहेत त्यापैकी ८० कोटी हे वेगवेगळया शासन विभागाकडून येतील व ८५ कोटी हे संबधीत एजन्सी टोल टॅक्स आकारून वसूल करणार आहेत. रस्त्यांच्या खाली ज्या काही सर्व्हीस लाईन आहे त्या शिफ्ट करण्यासाठी महानगरपालिकेस खर्च येणार आहे . या शहरात १०० कोटीचे रस्ते झाले तर महापालिकेस २ ते ४ कोटी फक्त खर्च येणार आहे. इतर रस्त्यासाठी ९.३४ कोटीची तरतूद केलेली

आहे स्पील ओवरची २३ कोटीच्या कामाचा सूधदा यात समावेश आहे दरवर्षी स्पील ओवरची कामे कमी कमी होत जवी यासाठी प्रयत्न करणार असून तीन ते चार वर्षात शून्य स्पील ओवर होईल अशी कार्यवाही करणार आहोत. सिध्दार्थ उदयान व प्राणी संग्रहालयासाठी ४० लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली असून इतर विकास इमारती यासाठी २.४० कोटीची तरतूद आहे यात पण स्पील ओव्हरची कामे आहेत. शहर सौदर्यीकरणासाठी १.०० कोटीची तरतूद आहे स.सदस्याचा स्वेच्छा निधी हा ३.५० कोटी शासन नियमानुसार ठेवलेला असून प्रत्येक नगरसेवकांना जवळपास ३.४० लक्ष रक्कम स्वत खर्च करता येऊ शकेल. शालेय क्रिडा स्पर्धा तसेच महापौर चषक क्रिडा स्पर्धा यासाठी ४० लक्षची तरतूद ठेवली आहे. महिला व बाल कल्याण समितीच्या अंतर्गत विकास करण्यासाठी ५० लक्षची तरतूद आहे यात नवीन काही काम करण्याचा मानस असून बालमजूर प्रथा नष्ट होणे महिला व मुलींसाठी स्वच्छतागृह बांधणे, अल्पवयीन मुलींसाठी काही योजना कार्यान्वित करणार आहोत त्याचे शिक्षण किवा वैद्यकीय उपचारासाठी खर्च करण्याच्या दृष्टीने आहे शहराचा विकास आराखडा यासाठी १५ कोटीची तरतूद आहे यासाठी जस्त तरतूद ठेवणे आवश्यक होते परंतु प्रशासन टीडीआर च्या संदर्भात तात्काळ कार्यवाही करणार आहे, शासनाकडे जे नकाशे वगैरे दिले होते ते आलेले आहे.या महिण्याच्या अखेरपर्यत टी.डी.आर. नुसार संपूर्ण सुनावणी होवून उपसंचालक नगररचना हे शासनाकडे पाठवतील. ही कार्यवाही झाल्यास भूसंपादनावर खर्च कमी येईल.संगणकीकरण करण्याचे प्रशासनाचे धोरण आहे पर्यटक कक्ष स्थापन करणार आहोत त्यामधे शहराच्या हेरीटेजचे नकाशे वगैरे करण्याचे काम सुरू केलेले आहे बी.ओ.टी. पध्दतीने काम करणार आहोत यासाठी १ लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली आहे पर्यटन कक्ष आणि जी हेरीटेज कमेटी सर्वसाधारणा सभेने मान्यता दिलेली आहे ते या बाबतीत हेरीग घेउन दोन्ही मिळून या शहराचे पर्यटन विकासामधे हातभार लाउ शकतील मोठे प्रकल्प राबविण्यासाठी पीएमसी नेमण्याचा मानस आहे स्थायी समिती समोर तसे प्रस्ताव येतीलच नागरीकांसाठी विमा योजना राबविण्यात येत आहे. परवाना देण्यासाठी एक खिडकीयोजना करीत आहोत तसेच ना नफा ना तोटा या बेसीसवर जे नागरीक कार्यालयापर्यत येउ शकत नाही अशाच्या घरी जउन कमी प्रमाणात फिस आकारून फॉर्म भरून घेवून त्यांना परवाना देण्याची व्यवस्था करणार आहोत.बीओटी पध्दतीने काही प्रपोजल यात घेतलेले आहे आणखी काही प्रपोजलचा समावेश करता येईल यानंतर प्रशासनाचे मत या सभागृहाने ऐकूण घेतल्याबधदल धन्यवाद देतो.तसेच लेखा विभागातील कर्मचारी व सर्व अधिकारी यांनी हा अर्थसंकल्प तयार करण्यास रात्रंदिवस मेहनत घेतली त्यांचेही अभिनंदन करण्यात येते.

मा.सभापती : आताच मा.आयूक्त यांनी या वर्षीच्या अर्थसंकल्पाच्या बाबतीत त्यांचे कल्पना मांडलेल्या आहेत तसेच सन २००४-०५ या मागिल वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या बाबतीतही माहिती दिलेली आहे. प्रशासनाने त्यांचे दृष्टीकोनातून हा अर्थसंकल्प सादर केलेला आहे या अर्थसंकल्पाच्या प्रति सर्व

सदस्यांना वितरीत करण्यात आलेल्या आहेत.हा अर्थसंकल्प तयार करतांना इतर शहराच्या मूलभूत सुविधा देण्या संबधीच्या ज्या काही सूचना असतील त्यावर तरतूद करण्याच्या दृष्टीने त्यावर अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात येत असून येत्या १२ जुलै२००५ रोजी याअर्थसंकल्पावर सविस्तर अशी चर्चा करण्यासाठी सभा आयोजित करण्यात येईल आजची सभा तहकूब करण्यात येत आहे.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद